क्रमांक : १०४

## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५/ आषाढ २४, १९४७ (शके)

**१०४.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

**(अ) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि, चर्चा न झालेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ३) :-**

**(१) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. १०३**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (**Trauma Center**) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (**Trauma Center**) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३**

"राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावीत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४३**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

**(ब) मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी बॅलटमध्ये आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ५) :-**

**(१) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३९**

"राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) ॲड पराग अळवणी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५०**

"राज्यातील प्रमुख शहरातून मोठ्या प्रमाणात वाढत असलेली अनधिकृत बांधकामे, त्याला आळा घालण्यासाठी स्थानिक संस्थांचे तसेच शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती व समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५१**

"राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे."

**(४) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ९०**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गांवर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर **(Trauma Center)** उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर **(Trauma Center)** उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. ३/-

(५) **<u>श्री. राहुल कुल, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७९</u>**

"राज्यात मुख्यतः शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थाचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरु करून अंमली पदार्थाच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १५ जुलै, २०२५**

**मेघना तळेकर**
**सचिव- २,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)